0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २८/०३/२०१३ रोजी प्राप्त प्रकरण व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२८/२०१३/जा.२७८, दिनांक ३०/०३/२०१३ व १२/०४/२०१३.

३) डेप्युटी जनरल मॅनेजर, प्रोडक्ट सप्लाय (ल्युबस), मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., मुंबई यांचे दिनांक १३/०६/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२८/२०१३/जा.१७८४
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ०३/०८/२०१३

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## अंतरीम आदेश

### (जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २३.०३.२०१३ रोजी या कार्यालयास प्राप्त तक्रारीनुसार या कार्यालयाच्या अधिपत्याखालील पथकाने मे.एच.पी.सी.एल कंपनी, माझगाव युनीट, हेबदर, शिवडी येथे सुमारे २२.३० वाजता कंपनीच्या बाहेर असलेल्या मोकळ्या जागेत धाड टाकली असता, नमूद ठिकाणी टॅंकर क्र. एमएच-०४-ईबी-६९५१, टॅंकर क्र. डब्लूबी-११-बी-४१४०, टॅंकर क्र. डब्लूबी-११-बी-४१६९ व टॅंकर क्र. एमएच-०४-ईबी-५८६६ हे टॅंकर उभे असल्याचे दिसून आले. सदर ठिकाणी उपस्थित असलेले इसम यांना अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष विचारले असता, सदरचे चारही टॅंकर हे एचपीसीएल कंपनीतून ऑईल भरुन निघाले असून सदर चारही टॅंकरमध्ये कंपनीच्या संबधित अधिकारी/कर्मचारी यांनी अतिरिक्त ऑईलचा साठा भरुन दिल्याची खात्रीलायक बातमी त्यांना मिळाली असल्याचे सांगितले. प्रस्तूत प्रकरणी, टॅंकर क्र. एमएच-०४-ईबी-६९५१ चा चालक मन्तुन जोगींदर महातो, डब्लूबी-११-बी-४१४० चा चालक शंकरकुमार प्रसाद यादव, डब्लूबी-११-बी-४१६९ चा चालक गोरेलाल सुरेंद्रप्रसाद यादव व एमएच-०४-ईबी-५८६६ चा चालक विमलेश कुमार सिंग तसेच चारही टॅंकरचे वाहतूकदार मे. अभय कॅरियर्स प्रा.लि चे संचालक संजय अग्रवाल व सुनील अग्रवाल या सर्वानी मे. हिंदूस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि या कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन गैरमार्गाने मास्टर की (Master key) हस्तगत करुन तसेच कंपनीतून बेस ऑईलच्या चलनावर नमुद केल्यापेक्षा अतिरिक्त साठा भरुन घेऊन तो स्वत:च्या स्वार्थापोटी, आर्थिक फायदयापोटी स्वत:जवळ बाळगून त्याची प्रचंड मोठया प्रमाणात अनधिकृत पेट्रोलजन्य पदार्थाच्या बेकायदेशीर अड्डा चालविणाऱ्यांना

पेट्रोलजन्य पदार्थाची अवैध विक्री करण्यासाठी घेऊन जात असल्याचे तपासणीत/धाडीत निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुद्ध शिवडी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.ख.क्र. १२/२०१३, दि. २६/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन चार टँकर व त्यामधील ऑईलचा साठा इ. असा मिळून एकूण रुपये १,२१,२३,६९१/- मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०९/०४/२०१३ व २३/०४/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाच्या विल्हेवाटीच्या सुनावणीची प्रक्रिया पूर्ण झाली असून त्याअनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देण्यात आली आहे. मे. अभय कॅरिअर्स प्रा.लि. चे संचालक यांनी मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ५ वे न्यायालय, दादर, मुंबई येथे नोटीस क्रमांक ४२१/एम/१३ अन्वये जप्त चारही टँकर परत मिळण्यासाठी अर्ज केला असून त्याअनुषंगाने मा. न्यायालयात सुनावणी सुरु आहे.

तथापी, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत दाखल गुन्हयातील जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे अधिकार जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ६ (अ) अन्वये मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्रात नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांना असल्याची बाब तसेच सदर बाबत सरकारी अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे परिपत्रक क्रमांक क्रिमिनॉलॉजी/६५/२२४३/२००४ दि. ०९/१२/२००४ अन्वये सर्व सहाय्यक सरकारी अभियोक्ता/अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांना सर्व पोलिस आयुक्त/अधिक्षक कार्यालय यांचेद्वारे कळविले असल्याची बाब तसेच शासन परिपत्रक क्रमांक जीवका-१००५/प्र.क्र.४३८/नापू-२३, दिनांक ३० ऑगस्ट, २००५ अन्वये जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ खाली जप्त केलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे अधिकार फक्त जिल्हाधिकाऱ्यांनाच आहेत. जिल्हाधिकारी हे ६(अ) प्रमाणे व कलम ६ (क) प्रमाणे शासन यांच्या व्यतिरिक्त इतर प्राधिकाऱ्यांना जप्त केलेला मुद्देमाल सोडून देण्याचे अधिकार अथवा विल्हेवाट लावण्यापासून प्रतिबंध या कायद्याच्या कलम ६ (ड) प्रमाणे केलेला आहे. ही तरतूद पोलिसांनी व जिल्हाधिकाऱ्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून न्यायालयाकडून माल सोडण्याचे आदेश दिले जाणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी, असे नमूद केले असल्याची बाब मा. न्यायालयाच्या निर्देशनास आणून देण्यात आलेली आहे.

मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., मुंबई या कंपनीचे प्रोडक्ट सप्लाय (ल्युबस) या विभागाचे डेप्युटी जनरल मॅनेजर यांचे दिनांक १३/०६/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, सदर गुन्हा नोंद प्रकरणी जप्त

करण्यात आलेल्या ४ टँकरमधील ल्युब ऑईलचा साठा हा त्यांच्या कंपनीच्या मालकीचा असून त्याकरिता यापूर्वी झालेल्या सुनावणीच्या वेळी लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेले ४ टँकर हे शिवडी पोलिस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले असून सदरचे टँकर दिनांक २३/०३/२०१३ रोजी एच.पी.सी.एल., माझगांव युनिटच्या बाहेर जप्त करण्यात आले आहेत. सदरहू टँकरमध्ये बेस ऑईल/ल्युब्रिकेटिंग ऑईलचा साठा असून त्याचे वितरण करावयाचे प्रलंबित आहे. सद्यस्थितीत टँकर हे खुल्या जागी उभे केले असल्याने त्यामधील पेट्रोलियम साठ्याच्या पतामध्ये बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सद्यस्थितीत पावसाळा असल्याने व सदरचा साठा खराब झाल्यास एच.पी.सी.एल. या तेल कंपनीस भारी आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने चारही टँकरमधील साठा हा त्यांना परत करण्याची विनंती केली आहे.

उपरोक्त गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले चारही टँकर हे सद्यस्थितीत शिवडी पोलिस ठाणे यांच्या ताब्यात असून त्यांनी चारही टँकर पोलिस ठाण्याच्या बाहेर उघड्यावर ठेवले असल्याने तसेच टँकर जप्त केल्यापासूनचा कालावधी जास्त झाल्याने टँकरमधील ऑईलचा साठा हा तापमानातील फरकामुळे खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मे. एच.पी.सी.एल. ही सरकारी तेल कंपनी भारत सरकारची अंगीकृत असलेली उपक्रम कंपनी आहे. सदर गुन्हा नोंद प्रकरणी पथकाने टँकर जप्त करताना चारही टँकरमध्ये चलनापेक्षा अतिरिक्त साठा भरुन दिल्याचे तसेच संबंधित टँकर चालकांकडे मिळून आलेली मास्टर की या सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता, टँकरमधील ऑईल साठ्याच्या गैरव्यवहारामुळे होणारी काळाबाजारीमुळे संबंधित तेल कंपनीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, मे. अभय कॅरिअर्स यांनी दाखल केलेल्या नोटीस प्रकरणी मा. न्यायालयात सुनावणी सुरु असल्याने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अंतर्गत या कार्यालयास प्राप्त असलेल्या अधिकारान्वये जप्त मुद्देमालाबाबत अंतिम निकालपत्र देण्यास विलंब लागणार आहे. सदरहू बाबी विचारात घेता, जप्त करण्यात आलेल्या ०४ टँकरमधील बेस ऑईलच्या साठ्याबाबत पुढील आदेशाच्या अधिन राहून अंतरीम आदेश पारीत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

<u>अंतरीम आदेश</u> :-

१) प्रस्तूत गुन्हा नोंद प्रकरणी, जप्त करण्यात आलेल्या टँकर क्रमांक एमएच-०४-ईबी-६९५१, डब्लूबी-११-बी-४१४०, डब्लूबी-११-बी-४१६९ व एमएच-०४-ईबी-५८६६ या चारही टँकरमधील चलनावरील नमूद साठा हा मे. एच.पी.सी.एल., माझगांव युनिट या तेल कंपनीस क्षतिपुर्ती बंधपत्र घेवुन परत करण्यात यावा व उर्वरीत अतिरिक्त ऑईलचा साठा हा शासनजमा करण्यात यावा.

२) उक्त अतिरिक्त ऑईलच्या साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या वरील मुद्देमालाव्यतीरिक्त शिल्लक राहीलेल्या मुद्देमालाबाबतचे आदेश यानंतर निर्गमित करण्यात येतील.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. अभय कॅरियरर्स प्रा.लि. तथा टँकर क्र. एमएच-०४-ईबी-६९५१, डब्लूबी-११-बी-४१६९, डब्लूबी-११-बी-४१४० व एमएच-०४-ईबी-५८६६ चे मालक

२) मे. एच.पी.सी.एल. लि. माझगांव युनिटचे एक्सीक्यूटीव्ह ऑपरेशन ऑफिसर अरुण काशिरामजी भिसीकर

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवडी पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शिवडी पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्यांची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., मुंबई या कंपनीचे प्रोडक्ट सप्लाय (ल्युबस) या विभागाचे डेप्युटी जनरल मॅनेजर यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

३) मे. एच.पी.सी.एल. लि. माझगांव युनिटचे चिफ टर्मिनल मॅनेजर यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, नविन मंत्रालय, ८ वा मजला, जी.टी. हॉस्पीटल कॉम्प्लेक्स इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी अग्रेषित.

५) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

६) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

0004